## थोडक्यात

### धारावीतील नेत्र चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

**मुंबई :** धारावी शंकर कवडे चाळीतील श्री धारेश्वर शिव मंदिराच्या प्रांगणात 'द एंकर फाऊंडेशन' आणि शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट, वडाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'दृष्टी' निःशुल्क संपूर्ण नेत्र रोग निदान शिबीर नुकतेच पार पडले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यात शेकडो नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. शिबिरात २८० हून अधिक नागरिकांनी भाग घेतला. फाऊंडेशनचे संस्थापक सचिन कानिफनाथ सोनावणे यांच्यासह, 'शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट'च्या निष्णांत डॉक्टरांसह १७ मदतनीसांनी भाग घेतला. शिबिरात अनेकांना मोतीबिंदू तसेच डोळ्यांचे आजार आढळल्याने त्या रुग्णांना पुढील मोफत उपचारासाठी 'शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट', वडाळा येथे पाठविण्यात आले. 'द एंकर फाऊंडेशन' संस्थापक सचिन सोनावणे म्हणाले की, ''धारावीतील सर्वसामान्य गरीब, कष्टकरी जनतेची निःस्वार्थपणे सेवा करणे हे त्यांचे ध्येय आहे. 'शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट', वडाळा यांच्याशी आमची संस्था संलग्न असून सालाबादप्रमाणे यंदाही शिबिराचे आयोजन करण्यात आले. या पुढेही अशीच शिबिरे घेण्यात येतील,'' असे ते म्हणाले.

### महापालिका 'बेस्ट' कर्मचाऱ्यांना मिळणार २६ हजारांचा बोनस

**मुंबई :** बृहन्मुंबई महापालिका तसेच 'बेस्ट' उपक्रमाचे अधिकारी, कर्मचारी यांना दीपावली-२०२३ निमित्त २६ हजार रुपये सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांच्या उपस्थितीत 'वर्षा' निवासस्थानी बुधवारी संध्याकाळी बैठक पार पडली.

# प्रदूषण नियंत्रणासाठी सरकार सज्ज

## मुंबईतील रस्ते धुण्यासाठी १ हजार टँकर; धूळ साफ करण्यासाठी विशेष पथके

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

राज्यातील प्रदूषण नियंत्रणासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सरसावले आहेत. हवेचा गुणवत्ता निर्देशांक सुधारण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजना 'ॲक्शन मोड'वर राबवाव्यात, असे निर्देश देतानाच सर्व प्रशासकीय यंत्रणांनी एकत्रितपणे प्रदूषणमुक्त महाराष्ट्राच्या दिशेने मोहीम स्वरुपात काम करावे, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी गुरुवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी दिले.

मुंबईतील रस्त्यांवरील धुळीला आळा घालण्यासाठी पाण्याची फवारणी करण्यासाठी एक हजार टँकर लावावेत. त्यासाठी विशेष पथक नियुक्त करावे. 'एमएमआरडीए'ची बांधकाम स्थळे धूळमुक्त आणि स्वच्छ करावीत. ॲण्टी स्मॉग गन, स्प्रिंकलर्सचा वापर वाढवावा, असे निर्देशच मुख्यमंत्री शिंदे यांनी महापालिका आयुक्तांना दिले. मुंबईसह महानगर परिसरात 'एमएमआरडीए'मार्फत विकास कामे सुरू आहेत, अशा बांधकाम ठिकाणांवर धूळ रोखण्यासाठी पत्रे लावतानाच ही सर्व ठिकाण धूळमुक्त करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी दिले. कामांच्या ठिकाणी लावण्यात आलेल्या पत्र्यांमुळे रस्त्यांवरून जाताना नागरिकांना त्रास होणार नाही याचीही दक्षता घ्यावी, असे मुख्यमंत्र्यांनी महानगर आयुक्तांना सांगितले.

'वर्षा' निवासस्थानी झालेल्या या बैठकीला मुख्य सचिव मनोज सौनिक यांच्यासह सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, पोलीस अधीक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी दूरदृश्य संवादप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले

यावेळी मुंबई महापालिकेचे आयुक्त इकबालसिंह चहल, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, 'एमएमआरडीए'चे महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी, पर्यावरण विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव गोविंदराज, 'एमआयडीसी'चे मुख्य कार्यकारी अधिकारी विपीन शर्मा, परिवहन विभागाचे प्रधान सचिव पराग जैन आदी यावेळी उपस्थित होते.

### अर्बन फॉरेस्ट वाढविण्याची सूचना

राज्यातील महानगरांमध्ये नागरी वन क्षेत्र (मियावाकी) वाढविण्यासाठी महानगरपालिकांनी पुढाकार घ्यावा, मेडनमध्ये वृक्षारोपण करावे, धुळीचे प्रमाण कमी करण्यासाठी स्प्रिंकलर्सचा वापर करावा, हवेतील प्रदूषणावर उपाययोजना करताना संनियंत्रण करावे, मुंबईमधील धुळीचे प्रदूषण कमी करण्यासाठी 'क्लाऊड सीडिंग'चा प्रयोग करावे आदी सूचना मुख्यमंत्र्यांनी केल्या.

# 'मुंबईकरांना मास्कची गरज नाही'

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

मुंबई शहर आणि उपनगरीय भागांतील हवेचा 'एक्युआय' समाधानकारक असून आता हवेचा दर्जा हळूहळू सुधारत आहे. बुधवार, दि. ८ नोव्हेंबरपासून मुंबईतील हवा चांगल्या दर्जाची असल्याची नोंद करण्यात आली आहे. त्यामुळे मुंबईतील नागरिकांना अद्याप मास्क लावण्याची गरज नाही, असे महापालिका आयुक्त इकबालसिंह चहल यांनी गुरुवारी स्पष्ट केले.

आयुक्त चहल यांनी म्हटले की, ''मुंबईतील 'एक्यूआय' आता आधीपेक्षा कमी आहे. 'एक्युआय' चांगल्या दर्जावर यावा, यासाठी आणखी प्रयत्न केले जाणार आहेत. पालिका रुग्णालयांत अस्थमा किंवा इतर आजारांच्या रुग्णांच्या वाढीसंदर्भात सर्व पालिका रुग्णालयांच्या अधिष्ठातांसोबत चर्चा केली आहे. अद्याप पालिका रुग्णालयात या आजारांच्या रुग्णांची संख्या जास्त वाढली नसल्याने काळजीचे कारण नाही,'' असे आयुक्त म्हणाले.

### पालिकेकडून मार्गदर्शक सूचना

प्रदूषणावर तोडगा काढण्यासाठी पालिकेने विविध उपाययोजना केल्या आहेत. यासाठी २७ मुद्द्यांची मार्गदर्शक सूचना तयार केली आहे. त्यात मुंबईतील रस्ते स्वच्छ करण्यापासून दर आठवड्याला 'एक्युआय'ची पातळी तपासली जाणार आहे. संध्याकाळी ७ ते रात्री १० वाजल्यानंतर कोणीही नियम न पाळल्यास कारवाई होणार आहे. शिवाय, मुंबईच्या प्रवेश मार्गावर स्प्रिंकल सिस्टम बसवली जाणार आहे. तसेच एक मोबाईल ॲप तयार केले जाणार असून नागरिकांच्या येणाऱ्या तक्रारीवर तत्काळ तोडगा काढला जाईल. या संदर्भातील नोटीस जाहीर करण्यात आली आहे. बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषण होताना आढळल्यास बांधकाम थांबवण्याचे आदेश देण्यात येतील. तसेच गरज पडल्यास दिल्लीच्या पार्श्वभूमीवर मुंबईतही कृत्रिम पाऊस पाडला जाईल, असे आयुक्त म्हणाले.

**मुंबई :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त 'मेरी माटी, मेरा देश' अभियान देशभरात राबविण्यात आले. या अभियानाचा भाग म्हणून महाराष्ट्रात 'सेल्फी विथ मेरी माटी' उपक्रम घेण्यात आला. यात महाराष्ट्राने १० लाख, ४२ हजार, ५३८ सेल्फींचा सर्वांत मोठा सेल्फी अल्बम बनविण्याचा विश्वविक्रम केला. त्याची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्'मध्ये झाली आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने गुरुवारी आयोजित केलेल्या एका कार्यक्रमात 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डस्'चे प्रमाणपत्र प्रदान केले. यावेळी राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री दीपक केसरकर, विधानसभा अध्यक्ष राहूल नार्वेकर, विधानपरिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे आदी उपस्थित होते.

# महापारेषणमध्ये 'सायबर सुरक्षा जागृती अभियान'

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीच्या (महापारेषण) मुंबईतील मुख्य सांघिक कार्यालयात राष्ट्रीय सायबर सुरक्षा महिन्याअंतर्गत 'सायबर सुरक्षा जागृती अभियान' राबविण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) नागसेन वानखेडे यांनी केले. सुरुवातीला महापारेषण कंपनीच्या साहाय्यक प्रोग्रॅमर अमृता जगदाळे-मिस्त्री यांनी अधिकारी, कर्मचाऱ्यांना सायबर सुरक्षेसाठी प्रतिज्ञा दिली. यावेळी वित्त संचालक अशोक फळणीकर, संचालक सुगत गमरे, सुनील सूर्यवंशी, कार्यकारी संचालक रोहिदास मस्के, मुख्य अभियंता पीयूष शर्मा, सुनील शेरेकर, मुख्य महाव्यवस्थापक (सुरक्षा व अंमलबजावणी) कैलास कणसे, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) संतोष आंबेरकर, मुख्य विधी सल्लागार डॉ. कीर्ती कुळकर्णी, अधीक्षक अभियंता किशोर गरूड, उपमहाव्यवस्थापक अजय पटेल आदींसह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# 'म्हाडा' सोडतीतील विजेत्यांना दिवाळीत करता येणार गृहप्रवेश

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

'म्हाडा'च्या २०२३ च्या संगणकीय सोडतीतील लाभार्थ्यांचा दिवाळीच्या मुहूर्तावर गृहप्रवेश करणे शक्य होणार आहे. 'म्हाडा'च्या मुंबई मंडळाने दि. १४ ऑगस्ट रोजी काढलेल्या ४०८२ सदनिकांच्या संगणकीय सोडतीतील यशस्वी पात्र अर्जदारांपैकी १०० टक्के विक्री किंमत, मुद्रांक शुल्क भरणा करून दस्तऐवज नोंदणी केलेल्या यशस्वी पात्र अर्जदारांना ताबा पत्र देण्यास सुरुवात केली आहे. आतापर्यंत सुमारे १५० पात्र यशस्वी अर्जदारांना ताबा पत्र देण्यात आले आहे.

दरम्यान, काही अर्जदारांनी सदनिकेची रक्कम पूर्ण भरलेली असली, तरी त्यांनी सदनिकेचा ताबा घेण्यापूर्वी अधिवास प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र, कलाकार असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे या अटी व शर्तीच्या अधीन राहून अर्ज केले होते व ते ही कागदपत्र सादर करू शकलेले नाहीत, अशा अर्जदारांना सदनिकेचा ताबा देण्याची प्रक्रिया प्रलंबित ठेवण्यात आली आहे.

**ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**
CIN: L74110MH1992PLC367633
Reg Office: 1205-1206, 12th Floor, Raheja Chambers, 213, Free Press Journal Marg, Nariman Point, Mumbai MH 400021. E-mail: 1connect@1gsp.in • website: www.1gsp.in

**UNAUDITED STANDALONE FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER AND HALF YEAR ENDED ON SEPTEMBER 30, 2023**

Amount in Lacs

| Sr. No. | Particulars | Quarter ending 30/09/2023 (Unaudited) | Half year ended on 30/09/2023 cumulative (Unaudited) | Corresponding 3 months ended in the previous year 30/09/2022 (Unaudited) |
|---|---|---|---|---|
| 1. | Total income from operations | 1164.91 | 2416.79 | 318.05 |
| 2. | Net Profit / (Loss) for the period (before Tax, Exceptional and/ or Extraordinary items#) | 91.83 | 222.42 | 21.68 |
| 3. | Net Profit / (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 91.83 | 222.42 | 21.68 |
| 4. | Net Profit / (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items#) | 69.11 | 167.18 | 22.13 |
| 5. | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit / (Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 69.11 | 167.18 | 22.13 |
| 6. | Equity Share Capital | 710.47 | 710.47 | 710.47 |
| 7. | Earnings Per Share (of Rs. /- each) (for continuing and discontinued operations) - | | | |
| | 1. Basic: | 0.97 | 2.35 | 0.31 |
| | 2. Diluted: | 0.97 | 2.35 | 0.31 |

Note: **(A).** The above is an extract of the detailed format of Quarterly and Half year ended 30.09.2023 unaudited Financial Results filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing and Other Disclosure Requirements) Regulations, 2015. The full format of the Quarterly/Annual Financial Results are available on the websites of the Stock Exchange(s) and the listed entity. (URL of the filings). **(B)** The impact on net profit / loss, total comprehensive income or any other relevant financial item(s) due to change(s) in accounting policies shall be disclosed by means of a footnote. **(C)** Exceptional and/or Extraordinary items adjusted in the Statement of Profit and Loss in accordance with Ind-AS Rules / AS Rules, whichever is applicable.

Date : 9th November, 2023
Place : Mumbai

On Behalf of Board of Director
For **ONE GLOBAL SERVICE PROVIDER LIMITED**
**Sanjay Upadhaya - Managing Director**
DIN: 07497306

# पु. ल. कलोत्सवात दुसऱ्या दिवशी संगीत, गायनासोबत दिव्यांगांची मल्लखांब प्रात्यक्षिके

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

राज्याच्या सांस्कृतिक कार्य विभाग आणि पु. ल. देशपांडे कला अकादमीने सुप्रसिद्ध साहित्यिक पु. ल. देशपांडे यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित केलेल्या कलोत्सवाचा दुसरा दिवस उत्साहात संपन्न झाला. सकाळी ७ वाजल्यापासूनच रसिकांची वर्दळ प्रभादेवीच्या रवींद्र नाट्य मंदिर येथे दिसून आली. कला उत्सवात अनेक दिवाळी पहाट आणि संगीत संध्या आयोजित केल्या आहेत. त्यापैकी पहिली दिवाळी

पहाट गुरुवार, दि. ९ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वाजता रवींद्र नाट्य मंदिरच्या नवीन मिनी थिएटर येथे संपन्न झाली. यावेळी पं. डॉ. राम देशपांडे यांच्या सुरेल रागसांगीताने रसिकांची मने तृप्त झाली.

**नेत्रहीनांचे नेत्रदीपक सादरीकरण**

दिव्यांग मुले शरीराने अपंग असली, तरीही मनाने त्यांच्या आकांक्षा शिखरावर पोहोचत असतात याचा प्रत्यय प्रत्यक्षिके पाहताना आला. संध्याकाळी ६.३० वाजल्यापासून ओमकार सामाजिक संस्थेच्या नेत्रहीन मुलांनी मल्लखांबाची प्रात्यक्षिके लीलया करून दाखवली. दिव्यांग मुलांनी मल्लखांब प्रात्यक्षिके सादर केल्यानंतर कालांगण येथे गायन, नृत्य, वादन दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची सांगता झाली. वाशी येथील अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची ही मुले होती.

# कोहिनूर स्क्वेअरच्या कॉंट्रॅक्टरला कोणाचा आशीर्वाद? : आ. प्रसाद लाड

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

दादरमधील कोहिनूर स्क्वेअरच्या पार्किंग लॉट तीनमध्ये नुकतीच रात्रीच्या सुमारास अचानक आग लागून काही वाहनांचे नुकसान झाले. येथील ठेकेदाराची वागणूक चांगली नसून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी भाजप आमदार प्रसाद लाड यांनी महापालिका आणि संबंधित विभागांकडे पत्राद्वारे केली आहे. तसेच कोहिनूर स्क्वेअरच्या कॉंट्रॅक्टरला कोणाचा आशीर्वाद आहे? असा सवाल लाड यांनी केला आहे.

कोहिनूर स्क्वेअर या टॉवरमध्ये अनेक कार्यालये असून, संबंधित ठेकेदाराच्या विरोधात वेळोवेळी तक्रारी दाखल करूनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे याविषयी तातडीने कार्यवाही करून ठेकेदारास कार्यमुक्त करून त्याला आशीर्वाद देणाऱ्या संबंधितावरही कठोर कारवाई करण्याची मागणी आमदार लाड यांनी केली आहे.

# मुंबई भाजपतर्फे दिवाळीत 'नमो उत्सव'

## लालबाग, दादर, वांद्रे, गोरेगाव, विक्रोळीत रंगतदार मैफिली

**मुंबई, दि. ९ : प्रतिनिधी**

गणेशोत्सव, दहीहंडी, नवरात्र उत्सवाप्रमाणेच आता मुंबई भाजपतर्फे शहरासह उपनगरांत 'नमो उत्सवां'तर्गत दिवाळी पहाट आणि दिवाळी संध्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून हा 'नमो' उत्सव साकारला आहे. मान्यवर कलावंत, गीत, संगीत आणि सूरांच्या मैफिलीत 'नमो' उत्सव शहरात तब्बल नऊ ठिकाणी साजरा करण्यात येणार आहे. जीवनगाणीचे प्रसाद महाडकर यांच्यातर्फे सर्व कार्यक्रमांचे संयोजन करण्यात आले असून सर्व कार्यक्रम मुंबईकरांना विनामूल्य आहेत.दिवाळीचा आनंद द्विगुणीत करण्याबरोबरच मुंबईकरांना या कार्यक्रमांच्या माध्यमातून सांगितिक मेजवाणीच मिळणार आहे.

### गिरगावात पालकमंत्री मंगलप्रभात लोढांच्या नेतृत्वात दिवाळी पहाट

गिरगाव, चर्नी रोड येथील साहित्य संघ मंदिरात कौशल्य विकास तथा मुंबई उपनगरचे पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वात सोमवार, दि. १३ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता. दिवाळी पहाट कार्यक्रम होणार आहे. यामध्ये अभिनेता संकर्षण कराडे आणि अभिनेत्री स्पृहा जोशी यांचा विनोदी खुमासदार शैलीतील कार्यक्रम होणार आहे.

भाजपच्या त्या त्या विभागात त्यांच्यामोफत प्रवेशिका उपलब्ध करून देण्यात येत आहेत. दिवाळीनिमित्त आयोजित या खास कार्यक्रमांना नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मुंबई भाजप अध्यक्ष ॲड. आशिष शेलार यांनी पकेले आहे.

**वांद्रे** येथील रंगशारदा नाट्यगृहात 'नमो' उत्सवात रविवार, दि. १२ नोव्हेंबर रोजी पहाटे ६ वाजता प्रख्यात गायिका आरती अंकलीकर- टिकेकर, संजीव चिम्मलगी यांची मैफिल होणार आहे. या मैफिलीचे निवेदन अमित काकडे, तर संगीत संयोजन निरंजन लेले यांचे असणार आहेत.

**दहिसर** येथील छ. शिवाजी महाराज रोड, आनंद नगर शेजारच्या विद्या मंदिर शाळेच्या सभागृहात आ. मनीषाताई चौधरी यांच्या पुढाकाराने 'नमो' उत्सवात शनिवार, दि. ११ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता दिवाळी संध्या कार्यक्रम होईल. यात दत्तात्रेय मेस्त्री, सोनाली कर्णिक, राधिका नांदे, अभिषेक नलावडे, स्मिता गवाणकर यांचे गीत सादरीकरण तर संगीत संयोजन अमित गोठीवरेकर, दीपक कुमठेकर यांचे असणार आहे.

**गोरेगाव** पूर्वेत नागरी निवारा परिषद झोन १/२ सर्कल जवळ दिवाळी पहाट कार्यक्रम होईल. दत्तात्रेय मेस्त्री, सोनाली कर्णिक, धनश्री देशपांडे, अभिषेक नलावडे यांचे सादरीकरण, तर कुणाल रेगे यांचे निवेदन असणार आहे.

**विक्रोळी** पूर्वेत कन्नमवार नगर नं.२ येथील विकास हायस्कूल सभागृहात सायंकाळी ६.३०वाजता दिवाळी संध्या कार्यक्रम होणार आहे.

**शिवाजी महाराज पार्क** दादर येथे मुंबई भाजप सचिव जितेंद्र राऊत, भाजप माहिम विधानसभा अध्यक्ष अक्षता तेंडुलकर यांच्या पुढाकाराने मंगळवार, दि. १४ नोव्हेंबर रोजी सकाळी ६ वाजता राजा बढे चौक शिवाजी पार्क दादर (पश्चिम) येथे दिवाळी पहाट कार्यक्रम होणार आहे.

### लालबागमध्ये आज दिवाळी संध्या

शिवडी विधानसभा अंतर्गत 'नमो' उत्सवात शुक्रवार, दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता लालबागच्या गणेश गल्ली मैदानावर दिवाळी संध्या कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमात गायक उत्तरा केळकर, कविता राम, अभिषेक नलावडे, केतकी भावे, श्रीरंग भावे यांचे गीत सादरीकरण, अमित काकडे यांचे निवेदन तर अभिनेते दिगंबर नाईक यांचा विशेष सहभाग असणार आहे.

**METROPOLITAN STOCK EXCHANGE OF INDIA LIMITED**
Address: - 205A, 2nd Floor, Piramal Agastya Corporate Park, Kamani Junction, LBS Road, Kurla (West), Mumbai – 400 070. • Tel:- 022-+91 22 6112 9000; Email: - Listing@msei.in

**PUBLIC NOTICE**

**Public notice for compulsory delisting of equity shares of companies in terms of Regulation 32(3) of SEBI (Delisting of Equity Shares) Regulations, 2021.**

In terms of Regulation 32(3) of the Securities and Exchange Board of India (Delisting of Equity Shares) Regulations, 2021 ("SEBI Delisting Regulations") and as per the rules made under Section 21A of the Securities Contracts (Regulation) Act, 1956 and the Rules, Bye-Laws and Regulations of Metropolitan Stock Exchange of India Limited ("the Exchange"), NOTICE is hereby given that the Exchange proposes to delist the undermentioned companies from the Exchange as the said companies have, inter alia, made out grounds for delisting of their securities i.e. the trading in the securities of the said companies has been under suspension for a period of more than six months on account of non-compliance with various provisions of SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 and various circulars issued by SEBI/ Exchange in this regards from time to time.

The Exchange has issued a show notice to the companies at their last known address and registered email address as per the Exchange records, asking the said companies to SHOW CAUSE as to why the equity shares of the Company should not be compulsorily delisted from the Exchange. They have either failed to reply to the Exchange communication or failed to take steps for completion of revocation of suspension in the trading of their securities.

The list of these companies along with their last know addresses as per exchange records, is given below: -

| Sr. No. | Symbol | Company Name | Registered Address of the Company |
|---|---|---|---|
| 1. | UPELECT | U P ELECTRICALS LIMITED (ISIN:- INE922R01011) | D-5, First Floor, Awadh Complex, Laxmi Nagar, East Delhi, Delhi, Delhi, India, 110092. |
| 2. | PORSCHE | PORSCHE CAPITAL MARKET LIMITED (ISIN:- INE939Q01017) | K H - 810, 2ND FLOOR MAHIPAL PUR EXTENSION ( NEAR MARUTI WORK SHOP), South West Delhi, NEW DELHI, Delhi, India, 110037 |
| 3. | RKMAN | R K MANUFACTURING CO LTD (ISIN:- INE423E01018) | 215-A, Manek Center, P.N. Marg, Jamnagar, Jamnagar, Gujarat, India, 361008 |

The Consequences of Compulsory Delisting include the following: -
These companies would cease to be listed on stock exchange.
In terms of **Regulation 33** of the SEBI Delisting Regulations,

*33. (1) Where the equity shares of a company are delisted by a recognised stock exchange under this Chapter, the recognised stock exchange shall appoint an independent valuer(s) who shall determine the fair value of the delisted equity shares.*
*(2) The recognised stock exchange shall form a Panel of expert valuers and from the said Panel, the valuer(s) for the purposes of sub-regulation (1) shall be appointed.*
*(3) The value of the delisted equity shares shall be determined by the valuer(s) having regard to the factors mentioned in sub-regulation (2) of regulation 20 of SEBI (Delisting of Equity shares) Regulations, 2021.*
*(4) The promoter(s) of the company shall acquire the delisted equity shares from the public shareholders by paying them the value determined by the valuer, within three months of the date of delisting from the recognised stock exchange, subject to the option of the public shareholders to retain their shares.*
*(5) The promoter shall be liable to pay interest at the rate of ten percent per annum to all the shareholders, who offer their shares under the compulsory delisting offer, if the price payable in terms of sub-regulation (3) is not paid to all the shareholders within the time specified under sub-regulation (4):*
*Provided that in case the delay was not attributable to any act or omission of the acquirer or was caused due to the circumstances beyond the control of the acquirer, the Board may grant waiver from the payment of such interest.*

In terms of **Regulation 34** of SEBI Delisting Regulations,

*34. (1) Where a company has been compulsorily delisted under this Chapter, the company, its whole-time directors, person(s) responsible for ensuring compliance with the securities laws, its promoters and the companies which are promoted by any of them shall not directly or indirectly access the securities market or seek listing of any equity shares or act as an intermediary in the securities market for a period of ten years from the date of such delisting.*
*(2) In case of a company whose fair value is positive –*
*(a) such a company and the depositories shall not effect transfer, by way of sale, pledge, etc., of any of the equity shares held by the promoters / promoter group and the corporate benefits like dividend, rights, bonus shares, split, etc. shall be frozen for all the equity shares held by the promoters/ promoter group, till the promoters of such company provide an exit option to the public shareholders in compliance with sub-regulation (4) of regulation 33 of these regulations, as certified by the relevant recognized stock exchange;*
*(b) the promoters, whole-time directors and person(s) responsible for ensuring compliance with the securities laws, of the compulsorily delisted company shall also not be eligible to become directors of any listed company till the exit option as mentioned in clause (a) is provided.*

*In case, any concerned person is desirous of making any representation to the Exchange, they may do so in writing with all supporting documents, **within 15 working days from the date of this Notice i.e. on or before Friday, December 8, 2023.** Scanned copy of the signed representation containing complete contact details (email id, address and phone number) of the person/s making the representation/s should be sent compulsorily by e-mail to the Exchange's email Id i.e. listing@msei.in.*
*Any anonymous representation(s) would not be considered valid.*
*Kindly note that representations that are sent through any mode of communication other than to the designated email id would not be construed as valid representation and thus, will not be considered by the Exchange.*

**Place: Mumbai** **Date: November 10, 2023**
**For and on Behalf of Metropolitan Stock Exchange of India**
**Authorised Officer**